पुढारी

# समाजाच्या उन्नतीसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

## कुलगुरू शिंदे : 'विद्यापीठ-उद्योजक भेट'

**कोल्हापूर: प्रतिनिधी**

विद्यार्थी, संशोधक आणि उद्योजकांनी संशोधनाच्या माध्यमातून समाजाची उन्नती साधण्यासाठी सामूहिकरीत्या प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी केले. विद्यापीठ परीक्षेत्रातील उद्योजक समूहाने पुढे येऊन विद्यापीठातील संशोधनाप्रती सकारात्मक भाव दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत, ही महत्त्वाची बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठ उद्योजक संवाद कक्ष व कोल्हापूर उद्योजक समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विद्यापीठ-उद्योजक भेट' ही एकदिवसीय कार्यशाळा वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहात झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी तज्ज्ञ उद्योजक एम. बी. शेख प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय दर्जाची उपलब्ध साधन सामग्री संशोधक विद्यार्थी आणि उद्योजकांना त्यांच्या क्षेत्रामध्ये नवनिर्मिती करण्यासाठी सहाय्यभूत ठरणार आहेत. उद्योजक एम. बी. शेख म्हणाले, विद्यापीठातील कमवा शिका योजनेतील इच्छुक विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासह आवडीच्या क्षेत्रात कामाचा अनुभव प्राप्त होण्यासाठी उद्योजक निश्चित प्रयत्न करणार आहेत.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनीही मार्गदर्शन केले. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. ए. व्ही. घुले यांच्यासह नामवंत उद्योजक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, संशोधक, शिक्षक उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठ अभ्यासक्रमात 'चंदगडी बोली'

लोकमत न्यूज नेटवर्क

**चंदगड :** प्राध्यापक पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या नेट व सेट परीक्षेच्या अभ्यासक्रमात आयोगाने 'चंदगडी बोली'चा समावेश करण्यात आला आहे. डॉ. नंदकुमार मोरे यांनी भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणात 'चंदगडी बोली'वरील दीर्घ नोंद लिहिल्यानंतर या बोलीचा शिक्षणक्षेत्रात प्रवेश सुकर झाला.



प्रा.नंदकुमार मोरे

हा प्रकल्प अलिकडेच 'ओरिअंट ब्लॅक्सवन' या जागतिक दर्जाच्या प्रकाशन संस्थेने इंग्रजी भाषेत अनुवाद करून प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठांनीही त्यांचा संदर्भग्रंथ अभ्यासक्रमात समाविष्ट केला आहे.

दहावीच्या अभ्यासक्रमातून महाराष्ट्रभर 'चंदगडी बोली' परिचीत झाली आहेत. मराठी पाठ्यपुस्तक आणि लोककलांच्या संकलन प्रकल्पाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनानेही ही बोली मराठीची अधिकृत बोली असल्याचे जाहीर केले आहे. आता ही बोली देशपातळीवरील अभ्यासक्रमात समाविष्ट झाल्याने 'चंदगडी बोली' अधिकृतपणे उच्चशिक्षणाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाली. या समावेशाबद्दल 'चंदगडी बोली'भाषकांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) ही भारतातील विद्यापीठीय शिक्षणावर नियंत्रण ठेवणारी देशातील सर्वोच्च संस्था आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत हा आयोग येतो.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 07, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# विद्यापीठाचा आजपासून पुण्यात रोजगार मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स पुणेतर्फे चिंचवड (पुणे) येथे आज, गुरुवारी आणि उद्या, शुक्रवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत महारोजगार मेळावा होणार आहे. यात राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्या सहभागी होत असून, १० हजारपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. सहभागासाठी शिवाजी विद्यापीठ व प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांच्या संकेतस्थळावर नावनोंदणी मोफत उपलब्ध आहे. माहितीसाठी डॉ. गजानन राशिनकर यांच्याशी संपर्क साधावा.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 07, 2019
Powered by: erelego.com

जनसंपर्क कक्ष
7 FEB 2019 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापु

# SUK job fair in Pune today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) in association with Pratibha Group of Institutions has organised a job fair at Chinchwad in Pune on February 7 and 8.

A press release issued by the SUK said that over 150 companies are going to be part of the fair wherein more than 10,000 vacancies are available. The timing of the fair, according to the statement, is from 10am to 5pm.

Through the press release, the varsity appealed to the graduates and those in search of employment to attend the job fair. The registration for the same can be done online on websites of Pratibha Group of Institutions and the SUK.

"Various degree and diploma holders along with the ITI candidates can register for the job fair. There is no fee for the candidates for registration and candidates should make the most out of this opportunity," the statement said.

According to the statement, alumni from the SUK had requested the varsity to organise a job fair in the Pune region following which it has been organised at Chinchwad. It added that various social organisations have also lent their support in order to organise this fair in a smooth manner.

A varsity official said that more of such job fairs are in pipeline in Kolhapur city and other parts of the division, including Sangli, Satara, and Kolhapur districts.